**MHKO050016342018**

सौ. गजाला इनामदार.
वि.
श्री. ईस्माईल इनामदार वगैरे.

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज.क्र.५२/२०१८ मधील**
**निशाणी क्र.४ खालील आदेश**
( दि.१२/११/२०१९ रोजी पारित केला )

सदरचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ (संक्षिप्ततेसाठी येथून पुढे सदर कायदा) मधील कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल करणेत आला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः-**

०२. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक २४/०५/२०१७ रोजी राजीव गांधी सांस्कृतिक भवन, इचलकरंजी येथे मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झालेला आहे. गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदाराचे पती, गैरअर्जदार क्र.२ व ३ हे सासू-सासरे व गैरअर्जदार क्र.४ व ५ हया नणंदा आहेत.

०३. अर्जदार कथन करते की, तिच्या आई-वडीलांनी लग्नाचा संपुर्ण खर्च सुमारे पाच लाख रुपये तसेच लग्नामध्ये तिला वेगवेगळे सोन्याचे दागिने दिलेले आहेत. लग्नानंतर गैरअर्जदार यांनी तिला दोन महिने व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर तिला स्वयंपाक करता येत नाही, भांडी घासता येत नाहीत, कपडे धुता येत नाहीत अशा किरकोळ कारणांवरुन तिचा मानसिक व शारिरिक छळ करण्यास सुरुवात केली. अर्जदार कथन करते की, गैरअर्जदार क्र.१ याला ऑक्टोबर-२०१७ मध्ये मेडीकल चालू करायचे असल्याने त्याने अर्जदार हिच्या वडीलांच्याकडून रक्कम रुपये तीन लाख घेऊन येण्यासाठी तगादा लावला होता. अर्जदार हिच्या वडीलांनी गैरअर्जदार क्र.१ याला रक्कम रुपये तीन लाख दिले होते. त्यावेळी गैरअर्जदार यांनी अर्जदारचे डी फार्मसी प्रमाणपत्र काढून घेतले होते.

०४. अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदार तिला मारहाण करणे, उपाशी ठेवणे

गलीच्छ भाषेत शिवीगाळ करणे, अपमान करणे अशा स्वरुपाचे शारिरीक व मानसिक छळ करत होते. त्यामळे, अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारपासून संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे संरक्षण आदेश व ईतर मागण्यांसाठी दाखल केलेला आहे.

०५. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र.१ हा उच्चशिक्षीत व फर्मासिस्ट आहे. त्याचे दरमहा उत्पन्न रक्कम रुपये ४० ते ५० हजार इतके आहे. तसेच त्याचे मेट्रो वॉच नावाच्या कंपनीचे घडयाळाचे दुकान आहे. त्याची मु.पो.केंपवाड, ता.रायबाग, जि.बेळगाव येथे स्वतःची शेत व घर मिळकत आहे. त्या शेतमिळकतीतून त्यांना वार्षिक ६ ते ७ लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. सबब, अर्जदार हिने सदर कायदयाचे कलम २३ प्रमाणे दरमहा रक्कम रु.१०,०००/- अंतरिम पोटगीची, तसेच नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.२,००,०००/- व तिचे स्त्रीधन आणि प्रमाणपत्रे यांची मागणी केलेली आहे.

## <u>गैरअर्जदारांचे थोडक्यात प्रतिकथन खालीलप्रमाणेः-</u>

०६. गैरअर्जदार यांनी <u>निशाणी क्र.१२</u> अन्वये म्हणणे सादर केलेले आहे. त्यांनी अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच त्यांचा विवाह दिनांक २४/०५/२०१७ रोजी मुस्लीम धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे झालेला असल्याची बाब मान्य केलेली आहे. परंतु, इतर सर्व बाबी नाकारलेल्या आहेत. गैरअर्जदार कथन करतात की, त्यांनी अर्जदार हिला आवश्यक त्या सोई-सुविधा वेळोवेळी पुरविलेल्या आहेत. गैरअर्जदार कथन करतात की, अर्जदाराच्या हट्टामुळे त्यांनी इचलकरंजी येथे भाडयाने खोली घेतलेली होती. गैरअर्जदार क्र.१ याच्या ऐपतीप्रमाणे त्यांनी खोली भाडयाने घेतलेली असल्यामुळे अर्जदार त्या खोलीमध्ये राहण्यास टाळाटाळ करत होती. त्या कारणावरुन ती गैरअर्जदार क्र.१ सोबत भांडण करत होती. गैरअर्जदार कथन करतात की, अर्जदार हिच्या वडीलांनी व तिच्या चुलत्यांनी इतर व्यक्तींना सोबत घेऊन येऊन दिनांक २८/०५/२०१८ रोजी त्याला प्रचंड मारहाण केली होती, त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याला गंभीर स्वरुपाच्या जखमा झालेल्या होत्या. त्याबाबत गैरअर्जदार यांनी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे फिर्याद देखील दाखल केलेली आहे. त्यामुळे, त्या फिर्यादीस प्रतिउत्तर म्हणून अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०७. त्यांनी पुढे असे कथन केले की, गैरअर्जदार क्र.१ याला मासीक रक्कम

रु.८,०००/- एवढा पगार आहे. त्याच्यावर आई-वडील व अविवाहीत बहिणींची जबाबदारी आहे. त्याउलट अर्जदार ही सुशिक्षीत असल्यामुळे ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. सबब, गैरअर्जदार यांनी अर्जदारचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०८. उभय पक्षांची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निश्चितीकरणासाठी उपस्थित होत आहेत. त्यावरील निष्कर्ष मी अनुमान काढून कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी दिसते काय? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार हिने मागणी केलेल्या अंतरीम मागण्या ती मिळण्यास पात्र आहे काय? | **अंशतः होकारार्थी. गैरअर्जदार क्र.१ याच्याकडून अर्जदार दरमहा रक्कम रु. १,५००/- मिळण्यास पात्र आहे.** |
| ०३. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

०९. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्टयर्थ तिच्या व गैरअर्जदार क्र.१ याच्या लग्नाची पत्रीका, लग्नाचे फोटो, तिला गैरअर्जदार यांनी मारहाण करुन घराबाहेर काढलेनंतरचा फोटो, लग्नाच्या यादीची प्रत, त्यांच्या धार्मीक विवाहाचे प्रमाणपत्र, अर्जदार हीला तिच्या वडीलांनी लग्नात घातलेल्या दागिन्यांच्या पावत्यांच्या प्रती, मिरज ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दिलेला तक्रारी अर्ज तसेच प्रतिज्ञापत्र इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१०. गैरअर्जदार यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदार हिचेवर उपचार केलेबाबतची मेडीकलची बीले, अर्जदाराचा वाढदिवस साजरा केलेला फोटो, अर्जदार हिचा गैरअर्जदार क्र.१ सोबतचा फोटो, कार्यक्रमाचे फोटो, अर्जदार हिचे लोकांकडून गैरअर्जदार

क्र.१ याला मारहाण झालेनंतरचे फोटो, गैरअर्जदार याचेवर मिरज येथील दवाखान्यात उपचार झालेसंदर्भातील कागदपत्रे, गैरअर्जदार याने शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे दिलेली फिर्याद इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

११.   अर्जदार व गैरअर्जदार यांचेतर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

**मुद्दे क्र.१ व २ करीताः–**

१२.   अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक २४/०५/२०१७ रोजी झालेला असल्याचे उभय पक्षकारांना मान्य आहे. त्यामुळे, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटुंबिक नातेसंबंध (Domestic Relation) असल्याचे सिध्द होत आहे.

१३.   प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी अर्जातील व म्हणण्यातील कथने अभिलेखावर आहेत. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्याच्या मुळ हेतुचा विचार करावयाचा झाल्यास तो हेतु गैरअर्जदार यांच्या कथनांपेक्षा अधिक महत्वाचा आहे असे मला वाटते. अर्जदार हिने अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र देऊन शपथेवर तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सांगितलेले आहे. एखादी स्त्री विनाकारण तिच्या पती व सासरच्या लोकांविरुध्द हिंसाचार झाल्याबाबतची खोटी कथने करेल असे प्रथमदर्शनी मला वाटत नाही. तसेच अर्जदार हिने अर्जामध्ये घडलेल्या प्रत्येक घटनांचा तपशिलवार उल्लेख केलेला आहे. त्यामुळे, प्रथमदर्शनी तरी अर्जातील कथने ही सत्य आहेत असे दिसते. अर्जातील नमुद कृत्ये ही कौटुंबिक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडत आहेत, त्यामुळे प्रथमदर्शनी गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसत आहे.

१४.   गैरअर्जदार यांचे असे कथन आहे की, त्यांनी अर्जदाराचा कधीही मानसिक अथवा शारिरीक छळ केलेला नाही. त्याउलट अर्जदार हिच्या वडीलांनी व चुलत्यांनी गैरअर्जदार क्र.१ याला दिनांक २८/०५/२०१८ रोजी बेदम मारहाण केल्याचे कथन केलेले आहे. त्याबाबत गैरअर्जदार क्र.१ याने शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे प्रथम खबर दाखल केलेली होती. त्या फिर्यादीला प्रतिउत्तर म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असल्याचे त्यांनी कथन केलेले आहे. गैरअर्जदार यांनी पोलीस ठाण्यात दिलेली प्रथम खबर तसेच त्यांना झालेल्या जखमांचे वैदयकिय प्रमाणपत्रे व छायाचित्रे हजर केलेली आहेत. परंतु, ती

सर्व कागदपत्रे ही पुराव्यानिशी सिध्द होणे आवश्यक आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ याला अर्जदाराच्या वडीलांनीच मारहाण केली होती ही बाबदेखील पुराव्यानिशी सिध्द झाल्याशिवाय तशा निष्कर्षास येता येणार नाही. त्यामुळे, सद्यस्थीतीत गैरअर्जदार याने मारहाणीबाबत दिलेल्या तक्रारीस प्रतिउत्तर म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे असे म्हणता येणार नाही.

१५.    अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याची बाब गैरअर्जदार यांना मान्य आहे. तिला नांदवायला घेऊन जाण्यासाठी अर्जदार क्र.१ याने काहीही प्रयत्न केलेले नसल्याचे अभिलेखावरुन निदर्षाणास येत आहे. अर्जातील नमुद कृत्ये ही प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचाराच्या संज्ञेमध्ये मोडत आहेत. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे स्त्रीवर कौटुंबिक हिंसाचार झालेला असल्यास तिला अंतरिम पोटगी देण्याची तरतुद आहे. अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या कौटुंबिक हिंसाचारास बळी ठरल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. त्यामुळे, ती कलम २३ च्या तरतुदींप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

१६.    अर्जदार हिने अर्जात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा फर्मासिस्ट असून त्याचे दरमहा उत्पन्न रक्कम रुपये ४० ते ५० हजार इतके आहे. तसेच त्याचे मेट्रो वॉच नावाच्या कंपनीचे घडयाळाचे दुकान आहे. त्यातून त्याला चांगले उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे त्याचे आरग येथे दोन मजली स्वतःचे आर.सी.सी. घर आहे. तसेच मु.पो.केंपवाड, ता.रायबाग, जि.बेळगाव येथे त्याची स्वतःची शेत व घर मिळकत आहे. त्या शेतमिळकतीतून त्यांना वार्षिक ६ ते ७ लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. त्याबाबत व गैरअर्जदार क्र.१ च्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. परंतु, गैरअर्जदार क्र.१ हा दरमहा रक्कम रु.८,०००/- इतके उत्पन्न मिळवितो असे त्याने म्हणण्यामध्ये कबूल केलेले आहे. यावरुन असे दिसते की, तो काहीतरी उत्पन्न मिळवितो.

१७.    गैरअर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करते, परंतु त्याबाबत देखील त्यांनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असल्यामुळे तिच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करणे ही गैरअर्जदार क्र.१ याची नैतिक जबाबदारी आहे. अर्जदार तिच्या माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदार क्र.१ याने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदार आर्थीक मदत

मिळण्यास पात्र आहे. सदर कायद्याचे कलम २० मध्ये नमुद केल्याप्रमाणे आर्थिक मदत ही पुरेशी, न्याय्य, योग्य व पिडीत व्यक्तीचे राहणीमानाशी सुसंगत असणे बंधनकारक आहे. अर्जदार हिच्या स्वतःच्या किमान दैनंदिन गरजा, दररोज वाढत जाणारी महागाई इ. बाबींचा विचार करता अन्नवस्त्रापोटी अर्जदार हिला दरमहा रक्कम रु. १,५००/- (रुपये एक हजार पाचशे मात्र) अशी पोटगी पुरेशी ठरेल असे मला वाटते. सदरची रक्कम मुळ अर्ज दाखल तारखेपासून देय राहील. अर्जदार हिने नुकसान भरपाई, स्त्रीधन व कागदपत्रांची मागणी प्रस्तुत अर्जामध्ये केलेली आहे. परंतु, त्याबाबत सविस्तर पुराव्याची आवश्यकता आहे. पुराव्याशिवाय अर्जदाराचे स्त्रीधन व कागदपत्रे हे गैरअर्जदार यांच्या ताब्यात आहेत अशा निष्कर्षास येता येणार नाही. तसेच नुकसान भरपाईची रक्कम ठरविण्यासाठी देखील पुराव्याची आवश्यकता आहे. त्यामुळे, त्या मागण्या प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराला देता येणार नाहीत असे माझे मत झालेले आहे. वरील कारणांमुळे मी मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष त्याअनुषंगाने नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ करीताः–**

१८. मुद्दे क्र.१ व २ मध्ये केलेल्या सविस्तर कारणमीमांसेच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

०१. अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.

०२. अर्ज दाखल तारखेपासून अंतीम आदेशापावेतो पोटगीची रक्कम म्हणून गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु. १,५००/- (अक्षरी रुपये एक हजार पाचशे मात्र) द्यावेत.

०३. सदर आदेशाची प्रत विनामुल्य उभय पक्षकारांना देणेत यावी.

०४. खर्चाबाबतचे आदेश मुळ अर्जातील अंतिम आदेशाप्रमाणे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by
Pradip Madan Mane
Date: 2019.11.12
14:29:05 +0530

दिनांकः १२/११/२०१९.
इचलकरंजी.

**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४, इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | P. M. Mane,<br>4th Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 12/11/2019 |
| Order signed by P.O. on | 12/11/2019 |
| Order uploaded on | 12/11/2019 |